दैनिक
अन्यायाचा प्रतिकार
# रायगड नगरी
महाराष्ट्राचा बुलंद आवाज..
• वर्ष १६ वे • अंक १७९ • MAHMAR/2006/17212 • रायगड • शुक्रवार दि.२४ सप्टेंबर २०२१ • किंमत १ ₹ www.raigadnagari.com

### अनंत गीते यांच्या वक्तव्याचा घेतला खरपूस समाचार

# जिल्ह्यामध्ये आघाडीचा धर्म प्रत्येकानेच पाळावा : प्रशांत पाटील



**दै.रायगड नगरी । दिपक घोसाळकर**

**कळंबोली : राष्ट्रवादी कॉंग्रेसच्या वरिष्ट नेत्यावर जर कोण गरळ ओकत असेल तर ते पक्ष कदापि सहन करणार नाही. अनंत गीते हे शिवसेनेने भंगारात काढलेली नेते असून ते दोन वर्ष विजनवासात होते. त्यांनी केलेल्या वक्तव्याची पक्षानेही साधी दखल घेतली नाही. तर कॉंग्रेस पक्षाचे महेद्र घरत हे पनवेल उरण मधील भाजपा वाढवण्यासाठी आपली शक्ती पणाला लावीत आहेत. तर सेनेचे काही बडे नेते सुनील तटकरे यांच्याकडे लोटांगण घालून कामे करून घेत आहेत. पालकमंत्री करीत असलेल्या विकासाच्या कामामुळेच काहीना पोटशूळ येत असून जिल्ह्यातील तीन महिंद्रा ना एक सुनील तटकरे निश्चितच भारी पडतील असे रोखठोक प्रतिपादन राष्ट्रवादी कॉंग्रेसचे प्रदेश सरचिटणीस तथा रायगड जिल्ह्याचे प्रवक्ते प्रशांत पाटील यांनी कळंबोली येथे अनंत गीते यांचा वक्तव्याचा खरपूस समाचार घेताना काढले आहे.**

शिवसेनेचे माजी खासदार अनंत गीते यांनी श्रीवर्धनमध्ये केलेल्या वक्तव्याचे तीव्र पडसाद जिल्ह्यात उमटत असून शिवसेना व कॉंग्रेस पक्षाने जणू राष्ट्रवादी कॉंग्रेस विरोधात रानच ठेवल्याचे दिसून येत आहे. अनंत गीते व कॉंग्रेसचे महेंद्र घरत यांनी केलेल्या वक्तव्याचा राष्ट्रवादी कॉंग्रेस पक्षाने निषेध करून खरपूस समाचार घेण्यासाठी कळंबोली येथे गुरुवारी सायंकाळी पत्रकार परिषदेचे आयोजन करण्यात आले होते. यावेळी राष्ट्रवादी कॉंग्रेसचे प्रदेश सरचिटणीस प्रशांत पाटील, कार्यकारी जिल्हा अध्यक्ष पनवेल शहरचे शिवदास कांबळे, पनवेल शहर जिल्हाध्यक्ष सतीश पाटील, राष्ट्रवादीचे जिल्हा उपाध्यक्ष दौलत शिंदे आदी पक्षाचे नेते यावेळी उपस्थित होते. या पत्रकार परिषदेमध्ये रायगड जिल्हा प्रवक्ते प्रशांत पाटील यांनी अनंत गीते यांच्या वक्तव्याचा खरपूस समाचार घेऊन निषेध व्यक्त केला. तसेच जिल्ह्यामध्ये आघाडीचा धर्म प्रत्येकानेच पाळावा असेही सूचक वक्तव्य त्यांनी केले.

मात्र सेनेच्या नेत्यांवर खरपूस समाचार घेऊन राष्ट्रवादीनेही पलटवार करून आम्हीही आघाडीचा धर्म पाळून विकासाची कामे करण्यास सज्ञ असल्याचे भीमसेन माळी यांनी यावेळी सांगितले. रायगड मधील सेना व कॉंग्रेसच्या नेत्यांना त्यांचे वरिष्ठ निश्चितच समजूत घालण्याचा प्रयत्न करतील व आगामी निवडणुका या आघाडीच्या माध्यमातूनच लढवण्याचे वक्तव्य प्रशांत पाटील यांनी पुन्हा व्यक्त करून राष्ट्रवादी कॉंग्रेसच्या सर्वोच्च नेत्यांबद्दल कोणीही गरळ ओकत असेल तर यापुढे त्यांची गय केली जाणार नसून त्यांना जशास तसे उत्तर पक्षाच्या माध्यमातून दिले जाण्याचा इशाराही यावेळी राष्ट्रवादीचे नगरसेवक सतीश पाटील यांनी यावेळी दिला.

> जिल्ह्यातील शिवसेनेचे महेंद्र दळवी, महेंद्र थोरवे, तसेच कॉंग्रेसचे महेंद्र घरत हे जरी एकत्र येऊन राष्ट्रवादीशी मुकाबला करण्याचे ठरवले तरी या तिन्ही महेंद्र वर राष्ट्रवादीचे खासदार सुनील तटकरे निश्चितच भारी पडतील. कॉंग्रेसच्या महेंद्र घरत यांनी पनवेल उरण मधील भाजपा वाढवण्याचे काम करू नये. आपला पक्ष कसा वाढेल व आघाडीचा धर्म कसा पाळावा. भविष्यात जिल्ह्यातील सर्व निवडणुका या आघाडीच्या माध्यमातूनच लढल्या जातील.
>
> **प्रशांत पाटील, प्रदेश सरचिटणीस, राष्ट्रवादी**

# उरणमध्ये चायनीज पदार्थ खाल्ल्याने ६ मुलांसह एका महिलेला विषबाधा

### चायनीज मालकासह एका कुकला मोरा पोलिसांकडून अटक



**दै.रायगड नगरी । जीवन केणी**

उरणमध्ये चायनीज फूड खाल्ल्याने एकाच कुटुंबातील सात मुलांना विषबाधा झाल्याची घटना घडली आहे. याप्रकरणी मोरा सागरी पोलिसांनी मालकासह एका कुकला अटक केली आहे.

उरण तालुक्यातील केगाव ग्रामपंचायत हद्दीतील विनायक –डोंगर आळी राहणारे नथुराम पाटील यांच्या घरी गणपती सणाच्या निमित्ताने पाहुणे आणि नातेवाईक आहे होते. त्यांच्यासाठी काल रात्री ९ च्या सुमारास उरण शहरातील एका चायनीजच्या टपरीवरुन चायनीज पदार्थ आणले होते. चायनीज पदार्थ खाल्ल्यानंतर ६ लहान मुलांसह एका महिलेला उलट्या होऊ लागल्या. त्यानंतर त्यांना उरण येथील इंदिरागांधी ग्रामीण रुग्णालयात उपचारासाठी तातडीने दाखल करण्यात आले.

उपचारानंतर त्यांना खाण्यातुन विषबाधा झाल्याचे निष्पन्न झाले. उपचारानंतर सहा मुलांची तब्येत सुधारली आहे. त्यापैकी एका मुलीच्या उलट्या थांबल्या नसल्याने तिच्यावर उपचार सुरू असल्याची माहिती इंदिरागांधी ग्रामीण रुग्णालयाचे वैद्कीय अधिक्षक डॉ. गौतम देसाई यांनी दिली आहे. दरम्यान मोरा सागरी पोलिसांनी या मुलांकडून अधिक माहिती मिळविण्याचे काम सुरू आहे. याप्रकरणी उरण शहरातील चायनीज टपरीचा मालक दिपक दळी व कुक अर्जुन घोष या दोघांना अटक करण्यात आली असल्याची माहिती मोरा सागरी पोलिसांनी दिली असून या प्रकरणी पोलिस हवालदार विजय पवार अधिक तपास करीत आहेत.

> **विषबाधा झालेली मुले :** कु.अर्णव पाटील (९), कु.सिद्धार्थ ठाकूर (१०), कु. सानिया सुनिल म्हात्रे(१५), कु. आर्या सुनिल म्हात्रे (७), कु. सिया निलकमल थळी (९), सुजल सतेंद्र ठाकूर व श्रीमती रिता सतेंद्र ठाकूर (३८)

### सिमाशुल्कच्या ताब्यातील ९० लाखांची

# मोबाइल ॲक्सेसरीज खोपटे ऑलकार्गो लॉजिस्टिक येथून लंपास

**दै.रायगड नगरी । उरण**

जेएनपीटी बंदरात आयात झालेल्या मोबाइल क्सेसरीजच्या कंटेनरमधील तपासणीमध्ये सिगारेट असल्याचा संशय सिमाशुल्क विभागाच्या अधिकाऱ्यांना आल्याने तो त्यांनी ताब्यात घेऊन खोपटे येथील अलकार्गो गोदामामध्ये ठेवण्यात आले होते. एक महिन्याच्या अवधी नंतर सदरचा कंटेनर उघडला असता, त्यातील माल चोरीला गेल्याचे निदर्शनास आले. सिमाशुल्क विभागाने दिलेल्या तक्रारीवरून उरण पोलिस ठाण्यात गुन्हा दाखल करण्यात आला आहे.

ठाणे येथील एच. आर. इंटरप्राईजेसने मोबाईल क्सेसरीज आयात केली होती. त्यात ४ हजार १५० किलो वजनाचे मोबाईल फोन क्सेसरीजचे १ हजार १४३ कार्टून होते. तपासणी सीमाशुल्क अधिकाऱ्यांना सिगारेट असल्याचे आढळल्याने कंटेनर ताब्यात घेऊन खोपटे येथील ऑलकार्गो लॉजिस्टिकमध्ये ठेवण्यात आला होता.

मात्र महिन्याभरात कंटेनर उघडला असता मोबाईल क्सेसरीजच्या ११४३ .../२

## संक्षिप्त...

### नितीन गडकरी यांच्या अडचणी वाढणार?; कॉंग्रेसने कोर्टात केली तक्रार

**नागपूर : वृत्तसंस्था**

केंद्रीय मंत्री नितीन गडकरी यांनी न्यायालयाचा अवमान केला असल्याचा दावा करणारा अर्ज कॉंग्रेसचे प्रदेशाध्यक्ष नाना पटोले यांनी मुंबई उच्च न्यायालयाच्या नागपूर खंडपीठापुढे दाखल केला आहे. तसेच गडकरींकडील सर्व विशेषाधिकार काढून घेण्यात यावेत असे आदेश उच्च न्यायालयाने पंतप्रधान नरेंद्र मोदी यांना द्यावेत, अशीही विनंती या अर्जाद्वारे करण्यात आली आहे.

गडकरी यांनी २०१९च्या लोकसभा निवडणुकीत खोटे शपथपत्र दाखल करून यश मिळविल्याचा आरोप त्यांच्यावर करण्यात आला आहे. या शपथपत्रात गडकरींनी आपली संपत्ती, उत्पन्न, वैयक्तिक माहिती चुकीची दिल्याचा दावा करण्यात आला आहे. यामुळे मतदारांची दिशाभूल झाली असल्याच आरोप पटोलेंनी केला आहे. पण गेल्या सुनावणीत गडकरींनी पलटवार केला होता. पटोलेंनीच या याचिकेसाठी दाखल केलेले शपथपत्र बेकायदेशीर असल्याचा प्रतिदावा केला होता. पटोलेंचे वकील सतीश उके यांनी याला विरोध केला असून पटोलेंचे शपथपत्र नियमांनुसारच असल्याचा दावा केला आहे.

# साई पॅलेस बारवर कारवाई

### २० जणांसह कर्मचारी व मॅनेजरवर गुन्हा दाखल

**दै.रायगड नगरी । पनवेल**

कोरोना विषाणूचा प्रादुर्भाव कमी होत चालला असल्याने पनवेलकरांनी हायसे घेतले असतानाच गेल्या १५ दिवसामध्ये बेकायदेशीररित्या व शासकीय नियम मोडून काही बार रात्री उशिरापर्यंत शासनाने दिलेल्या अटी व सुचनांचे पालन न करता सुरू असतात, अशा बारवर शासनाने कारवाई करून कायमस्वरुपी बंद करावेत, अशी मागणी तालुक्यातील कोन व तळोजा परिसरातील नागरिक करीत आहेत.

तालुक्यातील कोन गावच्या हद्दीतील साई पॅलेस बारमध्ये शासनाने दिलेल्या कोविड १९ उपाय योजना २०२० मधील सुचनांचे पालन न करता त्याचे उल्लंघन करून तेथे गर्दी जमवून त्यामुळे कोरोना विषाणू सारख्या रोगाचा प्रादुर्भाव होण्याची दाट शक्यता असल्याची जाणीव असताना देखील हयगयीने व निष्काळजीपणे सदर बार सुरू ठेवून सदर बारमधील महिला वेटर या पुरुष ग्राहकांच्या समोर अश्लिल व बिर्भत्स वर्तन करीत असल्याचे माहिती पनवेल तालुका पोलीस ठाण्याचे वपोनि रवींद्र दौंडकर यांना मिळताच त्यांच्या मार्गदर्शनाखाली सहा.पो.नि.प्रशांत शिर्के, अविनाश पाळदे, पो.उप.भरत पाटील आदींच्या पथकाने सदर ठिकाणी छापा टाकून या ठिकाणी एकूण २० जणांवर त्यामध्ये कर्मचारी, मॅनेज व गिऱ्हाईक अशांवर भादवी २७९, १८८, २९४ आपत्ती व्यवस्थापन अधिनियमन कलम ५१ ब अंतर्गत कारवाई केली आहे. १५ दिवसापूर्वीच या परिसरात असलेल्या टोपाझ बारवर सुद्धा अशा प्रकारे कारवाई करण्यात आली. त्यानंतर दोन दिवसानी तळोजा येथील चंद्रविलास .../२

# केंद्रीय पर्यावरण मंत्री भूपेंद्र यादव आणि विरोधी पक्षनेते देवेंद्र फडणवीस शनिवारी पनवेलमध्ये





**दै.रायगड नगरी । पनवेल**

सेवा व समर्पण अभियान अंतर्गत पंडित दीनदयाळ उपाध्याय जयंतीनिमित्त रायगड जिल्हा भाजपच्या वतीने शनिवार दिनांक २५ सप्टेंबर रोजी दुपारी ०१ वाजता पनवेलमध्ये कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले आहे. या कार्यक्रमास केंद्रीय पर्यावरण व वने मंत्री भुपेंद्र यादव तसेच महाराष्ट्र राज्य विधानसभेचे विरोधी पक्षनेते माजी मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांची प्रमुख उपस्थिती लाभणार आहे.


खांदा कॉलनी मधील चांगू काना ठाकूर(सिकेटी) महाविद्यालयाच्या प्रांगणात होणाऱ्या या कार्यक्रमास प्रमुख पाहुणे म्हणून प्रदेश संघटन मंत्री श्रीकांत भारतीय, प्रदेश सरचिटणीस तथा रायगडचे माजी पालकमंत्री रविंद्र चव्हाण, सेवा समर्पण अभियानचे प्रदेश प्रमुख राज पुरोहित, माजी खासदार लोकनेते रामशेठ ठाकूर, आमदार रविशेठ पाटील, आमदार महेश बालदी, महापौर डॉ. कविता चौतमोल, युवा मोर्चाचे प्रदेशाध्यक्ष विक्रांत पाटील, भाजपचे दक्षिण रायगड जिल्हाध्यक्ष महेश मोहिते, यांच्यासह जिल्ह्यातील पदाधिकारी उपस्थित राहणार आहेत.

या कार्यक्रमात मान्यवरांच्या हस्ते शासकीय योजनेतील लाभार्थींचा सन्मान, दिव्यांगांना मदत, कोरोनामुळे अनाथ झालेल्या विद्यार्थ्यांना मदत, तसेच कुष्ठरुग्णांना धान्यवाटप केले जाणार आहे. एकात्म मानववाद भारतात रुजवणारा नेता म्हणून पंडित दीनदयाळ उपाध्याय यांची जनमानसात ओळख आहे. संपूर्ण जग हे भांडवलशाही आणि साम्यवादावर वादविवाद करत होते. .../२

# स्थानिकांना डावलणाऱ्या अदानी पोर्ट विरोधात ग्रामस्थांचा एल्गार ; केले कामबंद

**दै.रायगड नगरी । कोर्लई**

आगरदांडा येथे सुरू असलेल्या अदानी पोर्ट च्या कामात स्थानिकांना डावलून बाहेरील ठेकेदाराला काम देणे, डी.बी.एम. व डी.पी.एल.कंपनीची असलेली काही स्थानिक ठेकेदारांची येणे बाकी, स्थानिक वाहतूकदारांना वर्षाची वर्कऑर्डर देऊनही गाड्या बंद करण्यात देण्यात आलेली नोटीस तसेच सुप्रीम कोर्टाची स्थगिती असताना देखील कंपनीचे राजरोसपणे सुरू असलेल्या कामाबाबत व स्थानिकांना प्रशिक्षण व रोजगार मिळावा. यासाठी अलिबाग–मुरुड मतदार संघाचे आमदार महेंद्र दळवी व शिवसेना तालुकाप्रमुख ऋषिकांत डोंगरीकर मान्यवर ग्रामस्थांनी येथील अदानी पोर्टचे एच.आर.कॅप्टन लोबो यांची प्रत्यक्ष भेट घेऊन कंपनी चे काम बंद करण्यात भाग पाडले. यावेळी स्थानिकांचे प्रश्न सोडविण्यासाठी आपण प्रयत्नशील असल्याचे आमदार महेंद्र दळवी यांनी सांगितले.



आगरदांडा येथील दिघी अदानी पोर्ट च्या कामाला सुरुवात झाली मात्र या कामात स्थानिकांना डावलून बाहेरील ठेकेदाराला बिनदिक्कतपणे काम दिले जाते, मागील दिघी पोर्टच्या कामात डी.बी.एम. व डी.पी.एल.कंपनीकडून अद्यापही काही स्थानिक ठेकेदारांची येणे बाकी आहे. सुप्रीम कोर्टाची स्थगिती असताना देखील कंपनीचे काम सुरू आहे. याठिकाणी स्थानिकांनी रोजगारासाठी बँकेचे कर्ज काढून बस, इनोव्हा, बोलेरो, पीक अप गाड्या लावल्या आहेत. कंपनीने अशा गाड्यांना एक वर्षाची वर्कऑर्डर देऊनही गाड्या बंद करण्यात अदानी पोर्ट तर्फे नोटीस देण्यात आली आहे. त्यामुळे वाहनचालक व मालकांवर प्रश्नचिन्ह निर्माण झाले आहे तसेच स्थानिकांना प्रशिक्षण व कायमस्वरूपी रोजगार मिळावा. याबाबत आमदार महेंद्र दळवी व ऋषिकांत डोंगरीकर मान्यवर ग्रामस्थ यांनी कंपनी व्यवस्थापनाकडे चर्चा केली. यावेळी स्थानिकांचे प्रश्न सोडविण्यासाठी आपण प्रयत्नशील असल्याचे आमदार महेंद्र दळवी यांनी सांगितले.

# महेंद्र घरत यांच्या नेतृत्वाखाली उरण कॉंग्रेसमध्ये इनकमिंग जोशात



**दै.रायगड नगरी । उरण**

कामगार नेते महेंद्र घरत यांनी रायगड जिल्हा कॉंग्रेस अध्यक्ष पदाची धुरा हाती घेतल्यापासून उरण, पनवेल, खालापूर, पेण, अलिबागसह संपूर्ण रायगड जिल्ह्यात खऱ्या अर्थाने कॉंग्रेस कार्यकर्त्यांमध्ये नवंचैतन्य संचारले नवचैतन्य निर्माण होऊ लागले आहे. अनेक कार्यकर्ते हे कॉंग्रेस पक्षापासुन दूर झालेल्यांची घरवापसी सुरू झाली आहे. उरण तालुक्यातील सारडे गावात उपसरपंच निवडणूक बिनविरोध पार पडली यामध्ये कॉंग्रेस पक्षाचे निष्ठावंत कार्यकर्ते आणि महेंद्र घरत अध्यक्ष असलेल्या यमुना सामाजिक शैक्षणिक संघटनेच्या ॲम्ब्युलन्सच्या मार्फत उरण पूर्व विभागात मोफत सेवा देण्यासाठी व कोरोना काळात कोरोना पेशंटनां अहोरात्र मदत करणाऱ्या समिर पाटील या सामान्य कुटुंबातील व्यक्तीला उपसरपंच बनविण्याचा महत्वाकांक्षी निर्णय महेंद्र घरत यांनी व कॉंग्रेस कमिटीनी घेतला.

यावेळी नवनिर्वाचित .../२

# पाली बस स्थानक परिसरात चिखलाचे साम्राज्य

**दै.रायगड नगरी । गौसखान पठाण**

**सुधागड / पाली** : कोरोनाच्या संसर्गामुळे बर्याच प्रमाणात लाल परिच्या फेर्या कमी झाल्याने पाली बसस्थानकामध्ये सर्व सामान्यांची वर्दळ देखील कमी झालेली आहे. सततच्या पावसाने पाली एसटी बसस्थानकाची दुरवस्था झाली असून, स्थानकाच्या आवारात डबकी साचून सर्वत्र चिखलाचे साम्राज्य पसरले आहे. त्यामुळे पाली बसस्थानक पाण्यात हरवले की काय असा प्रश्न प्रवाशांना पडला आहे.

सुधागड तालुक्यातील मध्यवर्ती ठिकाणी पालीचे एसटी बसस्थानक असून या स्थानकात प्रवाशी व विद्यार्थ्यांची मोठी वर्दळ असते. या बसस्थानकात साचणार्या पावसाच्या पाण्याचा निचरा होण्यासाठी योग्य ती व्यवस्था नसल्याने स्थानकात सतत पावसाचे पाणी साचते. गेल्या अनेक वर्षापासून ही समस्या येथे असून त्याबाबत कोणतीही ठोस उपाययोजना आजपर्यंत करण्यात आली नसल्याने दरवर्षी ही परिस्थिती उद्भवते. स्थानकात पडलेल्या लहान मोठ्या खड्ड्यात पाणी साचून डबकी तयार झाली असून संपूर्ण स्थानकाच्या परिसरात चिखलाचे साम्राज्य पसरले आहे. त्यामुळे येथील प्रवाशांना त्रासाला सामोरे जावे लागत आहे. या सर्व समस्यांवर काही तरी तोडगा काढावा अशी मागणी येथील प्रवासीवर्ग करीत आहे.



# धनिकांच्या दारी श्रीमंती

'ज्यांच्याकडे अमाप पैसा आणि सुखसोयी, ते अधिक संपन्न' अशी व्यावहारिक श्रीमंतीची व्याख्या केली जाते. पैशांपुढे नतमस्तक होणारी पिढी काल होती. आजही ते चित्र बदललेले नाही. पैसा कमाविणे वाईट नाही, तो कमाविण्याच्या पद्धतीबाबत मतांतरे असू शकतात. निधी आणि संसाधनांचे समन्यायी वाटप होत असेल, तर संबंधित देशाने नैतिक पातळी सोडलेली नाही, असे मोजमाप केले जाते. जगभरातील संपत्तीचे चित्र समन्यायी नसल्याचे आढळते. पैसा माणसाला भ्रष्ट बनवितो. भ्रष्ट मार्गाने खोऱ्याने पैसा ओढता येतो. असे असतानाही वंचित, दरिद्री लोकांविषयीचा कळवळा आणि श्रीमंतांकडील पैसा एकाच वेळी टोकाने वाढतो आहे. राष्ट्रीय नमुना सर्वेक्षणाने २०१९मध्ये केलेल्या अखिल भारतीय कर्ज आणि गुंतवणूक सर्वेक्षणात हेच तथ्य उघड झाले. देशातील आर्थिक आणि भौतिक संपत्तीच्या अर्ध्या वाट्यावर फक्त दहा टक्के श्रीमंत लोकांचा कब्जा असून, तळाच्या पन्नास टक्के लोकसंख्येकडे दहा टक्क्यांहून कमी मालमत्ता आहे. दहा टक्के श्रीमंत भारतीयांकडे शहरी भागातील ५५.७ टक्के, तर ग्रामीण भागातील ५०.८ टक्के मालकी एकवटली आहे. जमीन, पशुधन, इमारती, वाहने, बँका, पोस्ट, कंपन्यांमधील ठेवींच्या निकषांवर संपत्तीचे मूल्य ठरवून हा अंदाज लावला जातो. जानेवारी ते डिसेंबर २०१९ दरम्यानच्या सर्वेक्षणातील हे निष्कर्ष धक्कादायक आहेत. शहरी लोकसंख्येच्या भौतिक आणि आर्थिक मालमत्तांचे मूल्य २७४.६ लाख कोटी रुपये होते; त्यापैकी १३९.६ कोटी रुपयांचे स्वामित्व भारतातील सर्वाधिक दहा टक्के श्रीमंतांकडे होते. भारतात दोन तृतीयांश लोक ग्रामीण भागात राहतात. दिल्लीत दहा टक्के श्रीमंतांच्या ताब्यात ८०.८ टक्के संपत्ती आहे. अखेरच्या अर्ध्यांकडे केवळ २.१ टक्के पैसा आहे. हा आर्थिक अन्याय जगभर आहे. जगातील एकूण संपत्तीपैकी अर्धी केवळ एक टक्का व्यक्तींकडे एकवटली आहे. क्रेडिट सुइस ग्लोबल वेल्थ अहवालाने ही वास्तविकता पुढे आणली होती. २००८मधील जागतिक मंदीमुळे फटका बसल्याचे बोलले जात असले, तरी श्रीमंतांना मात्र प्रचंड फायदा झाला. त्यांचा जगाच्या संपत्तीतील ४२.५ टक्के वाटा वाढून ५०.१ टक्क्यांवर पोहोचला. त्या अहवालानुसार सर्वाधिक श्रीमंत असलेल्या एक टक्का व्यक्तींकडील संपत्ती १०६ ट्रिलियन पाउंड (९०,९३,२१० अब्ज रुपये) एवढी होती. हा आकडा अमेरिकेच्या अर्थव्यवस्थेच्या आठ पट आहे. जगभरातील दहा टक्के श्रीमंत व्यक्तींकडे ८७.८ टक्के संपत्ती असेल, तर श्रमिकांना समन्यायी पातळी मिळवून देण्याचा लढा अजूनही किती कुचकामी आहे, याची कल्पना येते. जगातील अर्ध्या दरिद्री व्यक्तींकडे केवळ २.७ टक्के संपत्ती असल्याचे समजल्यावर तर अनेक कार्यकर्ते निराश होतील. गरिबांचा कुणी वाली नसतो, हा केवळ आरोप नाही. जगातले महत्त्वाचे निर्णय अर्थसम्राटांना कुर्निसात करतात. मूठभरांच्या हितासाठी निर्णय वाकविले जातात. श्रीमंत देशांच्या गटांनी करोनाच्या लशींचे उत्पादन होण्यापूर्वीच त्यांचा ५० टक्क्यांहून जास्त वाटा खरेदी करून टाकल्याचा दावा 'ऑक्सफॅम'ने केला होता. प्राण नव्हे तर पैसा, ही आधुनिक गुणवत्ता किती आसुरी रूप घेते आहे, हे यावरून लक्षात येते. श्रीमंतांसाठी वेगळा न्याय असल्याचे वर्तमान त्यातून कळते. गरीब, वंचितांसाठी जगभरातील दातृत्वाच्या कथा सामान्यांना स्तिमित करतात. श्रीमंतांच्या आर्थिक करामती मात्र त्याहून आश्चर्यकारक असतात. एकीकडे गरीब अधिक पिचला जातो आहे, दुसरीकडे निवडक श्रीमंतांच्या पैसाप्रवाहाने ओहोटी बघितलेली नाही. 'ॲमेझॉन'चे संस्थापक जेफ बेझॉस यांचे उदाहरण देता येईल. त्यांची संपत्ती वाढून ११२ अब्ज डॉलरवर पोहोचली. त्यांच्या संपत्तीच्या एक टक्का रक्कम, म्हणजे इथिओपियाचे आरोग्याचे बजेट. लॉकडाउनमध्ये जेफ बेजोस यांची संपत्ती एका दिवसात १३ अब्ज डॉलर, म्हणजेच ९७ हजार २०० कोटी रुपयांनी वाढली. मुकेश अंबानी याच काळात श्रीमंतांच्या यादीत दहाव्यावरून सहाव्या क्रमांकावर पोहोचले. करोना काळात त्यांची दर तासाची मिळकत ९० कोटींची होती. दहा टक्क्यांकडे पन्नास टक्के संपत्ती असल्याचे कळल्यावर श्रीमंत वर्ग अधिक अंतर्मुख झाला, तर अधिक बरे. तसे होण्याची शक्यता कमीच; मात्र गरिबांच्या उन्नतीसाठी सामान्यांची संघटित चळवळ उभी होणे गरजेचे आहे. आर्थिक स्तर जीवनमान उंचावतो. आरोग्याशी आणि शिक्षणाशी हा स्तर जुळलेला असतो. एकीकडे कॉर्पोरेट फंडच्या नावाखाली करामध्ये सवलत मिळविण्याचे कावे मोठ्या कंपन्यांकडून सुरू असताना, पिचलेल्यांचे दावे निरुत्तर आहेत. स्वच्छ आणि सुंदरतेला समर्थ भारताची जोड देताना, समन्यायाचा सिद्धान्त विसरून चालणार नाही. पैशांच्या तुलनेत 'ना बाप बडा, ना भय्या' हीच जगाची रीत आहे. सरकारांनीही वंचितांचा प्राधान्याने विचार करावा. धनिकांनी मनाची श्रीमंती दाखवावी, या आवाहनाखेरीज सामान्यांच्या हाती काही उरलेले नाही.

# महाराष्ट्रात काँग्रेसला क्रमांक १ चा पक्ष बनवून पुन्हा गतवैभव प्राप्त करून देऊ : नाना पटोले

**दै.रायगड नगरी । मुंबई**

राज्यात काँग्रेस पक्षाला क्रमांक एकचा पक्ष बनविण्यासाठी सर्वांनी मिळून एकत्रितपणे जातीय, धर्मांध शक्तींविरोधात पूर्ण ताकतीनिशी लढून महाराष्ट्रात पुन्हा काँग्रेस पक्षाला गतवैभव मिळवून देण्याचा ठराव महाराष्ट्र प्रदेश काँग्रेस कमिटीच्या नवनियुक्त कार्यकारिणीत एकमताने मंजूर करण्यात आल्याची माहिती महाराष्ट्र प्रदेश काँग्रेस कमिटीचे अध्यक्ष नाना पटोले यांनी दिली आहे.



महाराष्ट्र प्रदेश काँग्रेस कमिटीच्या नवनियुक्त पदाधिका-यांची बैठक आज प्रदेश काँग्रेसचे मुख्यालय टिळक भवन येथे आयोजित करण्यात आली. बैठकीनंतर पत्रकारांशी संवाद साधताना पटोले म्हणाले की, या कार्यकारिणीत केंद्र सरकारच्या अनेक धोरणांच्या निषेधाचे ठराव करण्यात आले. केंद्रातील नरेंद्र मोदी सरकारने आपल्या उद्योगपती मित्रांच्या फायद्यासाठी आणलेल्या कृषी कायद्यांमुळे देशातील शेतकरी व शेती उद्ध्वस्त होणार आहे. या कायद्यांमुळे शेतकऱ्यांना बड्या उद्योगपतीचे गुलाम बनवण्याचा केंद्रातील मोदी सरकारचा डाव आहे. महाराष्ट्र प्रदेश काँग्रेस कमिटी या काळ्या कृषी कायद्यांचा विरोध करत असून हे कायदे रद्द होईपर्यंत संघर्ष करत राहण्याचा ठराव मंजूर करण्यात आला.

केंद्रातील नरेंद्र मोदी सरकारच्या चुकीच्या धोरणांमुळे देशात महागाई प्रचंड प्रमाणात वाढली आहे. इंधनाचे दर १०० रूपये लिटरच्या वर गेले आहेत. खाद्यतेलाचे दर २०० रू. किलो तर स्वयंपाकाचा गॅस ९०० रूपयांवर गेला आहे. या प्रचंड दरवाढीमुळे सर्वसामान्यांचे जगणे मुष्कील झाले आहे. त्यासोबतच मोदी सरकारच्या गलथानपणामुळे देशात मोठ्या प्रमाणात बेरोजगारी वाढली आहे. देशातील बेरोजगारी गेल्या ४५ वर्षातील उच्चांकी पातळीवर पोहोचली आहे. महागाई व बेरोजगारी वाढवून सर्वसामान्य जणांचे जगणे मुष्कील करणा-या व बेरोजगारी वाढवून तरूणांचे भविष्य उद्धवस्त करणा-या केंद्र सरकारच्या निषेधाचा ठराव मंजूर करण्यात आला.

राज्यातील महिलांच्या सुरक्षेसाठी आंध्र प्रदेशातील शक्ती कायद्याच्या धर्तीवर राज्यात कायदा करण्याचा ठरावही कार्यकारिणीत करण्यात आला. केंद्र सरकार ओबीसी व मराठा आरक्षणाचे मारेकरी आहे. ओबीसी जनगणनेचा डेटा केंद्र सरकारने दिला नाही, त्यामुळे ओबीसींचे राजकीय आरक्षण रद्द झाले. तर आरक्षणाची ५० टक्क्यांची मर्यादा केंद्र सरकारने हटवली नाही. त्यामुळे मराठा समाज आरक्षणापासून वंचित आहे. ओबीसी व मराठा आरक्षणाचे मारेकरी असणा-या केंद्र सरकारचा निषेधाचा आणि कामगार कायद्यांत बदल करून कामगारांना उद्धवस्त करणा-या केंद्र सरकारच्या निषेधाचा ठरावही या बैठकीत करण्यात आला.

# नवीमुंबई विमानतळाला पक्षांच्या धडकण्याचा धोका

## पर्यावरणतज्ज्ञांनी केंद्रीयमंत्री ज्योतिरादित्य सिंधियांना पाणथळ क्षेत्रांच्या बचावाबाबत निवेदन

**दै.रायगड नगरी । उरण**

बीएनएचएसच्या एक अभ्यासाला नमूद करत, पर्यावरणतज्ञांच्या समुहांनी नागरी उड्डाणमंत्री ज्योतिरादित्य सिंधियांकडे नवीमुंबईतल्या पाणथळ क्षेत्रांच्या निरंतर चाललेल्या ऱ्हासामुळे नवीमुंबई आंतरराष्ट्रीय विमानतळाच्या (एनएमआयए) फ्लाइट्सना असलेल्या पक्षांच्या धडकीच्या गंभीर धोक्याबद्दल सूचना देण्यासाठी निवेदन दिले आहे. महाराष्ट्राचे उपमुख्यमंत्री अजित पवार यांच्या विधानाप्रमाणे, विमानतळ आता तीन वर्षांच्या आत तयार होणार आहे.



लाखो स्थलांतरीत पक्षी दरवर्षी या पाणथळ क्षेत्रांना भेट देतात, पाणथळ क्षेत्रावरच्या भरावामुळे नव्या लँडिंग आणि राहण्याच्या स्थळांच्या शोधार्थ ते बराच वेळ हवेत राहू शकतात. यामुळे फ्लाइट्ससाठी धोका निर्माण होईल, असे बीएनएचएस अभ्यास सांगतो. पाणजे पाणथळ क्षेत्र हे नवीमुंबई मधील सर्वातमोठे स्थलांतरीत वॉटरबर्ड एकत्रीकरण स्थळ असून ते महाराष्ट्रातल्या सर्वोत्तम पक्षीस्थळांपैकी एक आहे. आम्ही ठाणे खाडी फ्लेमिंगो अभयारण्याशी निगडीत असलेल्या या आणि इतर पाणथळ क्षेत्रांना संरक्षित स्थळे घोषित करण्याची सूचना देतो, कारण भरतीच्यावेळी अभयारण्यात जेव्हा पूर येतो, तेव्हा अभयारण्यातील वॉटरबर्ड्स निवा-यासाठी या स्थळांचा वापर करतात. असे बीएनएचएसचे म्हणणे आहे. अभ्यासाला निदर्शनास आणून नॅटकनेक्ट फाउंडेशनने पुन्हा एकदा शासनाला पांजे, बेलपाडा, भेंडखळ, एनआरआय, आणि टीएस चाणक्यचा आंतर्भाव करत पाणथळ क्षेत्रे संरक्षित करण्याची खात्री करण्याची विनंती केली आहे. नॅटकनेक्ट जागतीक स्थलांतरीत पक्षी दिनाच्या (WMBD) निमित्त्याने पक्षांच्या गंतव्यस्थळाचे रक्षण करण्यासाठी डिजीटल अभियान चालवत आहे.पाणजेचे एमएमआर जैवविविधता उद्यान (MMR Biodiversity Park) म्हणून संवर्धन करण्याची सूचना शासनाच्या विचाराधीन आहे असे नॅटकनेक्ट फाउंडेशनचे संचालक बी. एन. कुमार म्हणाले. आम्ही आता श्री सिंधिया यांना या समस्यांचे गंभीरपणे परिक्षण करण्यासाठी आणि पाणथळ क्षेत्रे, पक्षी आणि हवाई प्रवासी संरक्षित राहण्याची खात्री करण्यासाठी लेखी विनंती केली आहे.असे श्री कुमार यांनी सांगितले. सांडपाणी, पावसाचे पाणी आणि सर्वोच्च भरतीच्यावेळी भरतीचे पाणी गावांमध्ये साचते, खासकरुन भरतीचे पाणी खाडी,वॉटर चॅनल्समध्ये साठून गंभीर स्वरुपाच्या आरोग्य व स्वच्छता समस्यांना कारणीभूत ठरते. शासन व एनजीटीने आदेश देऊन देखील पांजेची वॉटर इनलेट्स ब्लॉक असलेली आढळतात. एका बाजूला भरतीचे पाणी थांबवले गेले आहे तर दुस-या बाजूला पावसाच्या पाण्याचा निचरा करु दिला जात नाही. हे अतिशय घातक आहे, असे श्री एकवीरा आई प्रतिष्ठानचे अध्यक्ष नंदकुमार पवार म्हणाले.

एनआरआय पाणथळ क्षेत्रे लेसर फ्लेमिंगो, ग्रेटर फ्लेमिंगो आणि बदकांच्या मोठ्या थव्यांची निवासस्थाने आहेत. बांधकाम, भराव घालणे आणि मासेमारीसाठी पाणथळ क्षेत्रांच्या सुधारणांसारख्या अनेक अडचणींमुळे पक्षांचे हे मोठे थवे जेएनपीटी आणि उरणच्या भूअंतर्गत पाणथळ क्षेत्रांकडे वळू शकतात. नवीमुंबई आंतरराष्ट्रीय विमानतळासाठी (एनएमआयए) ही भविष्यातली अत्यंत गंभीर जोखीम ठरु शकते असे बीएनएचएसच्या रिपोर्टमध्ये सांगण्यात आले.

# उरळी कांचन येथे मराठी पत्रकार परिषदेचे ४४ वे राष्ट्रीय अधिवेशन : एस.एम.देशमुख

**दै.रायगड नगरी । पद्माकर उभारे**

**माणगाव** : अखिल भारतीय मराठी पत्रकार परिषदेचे ४४ वे अधिवेशन १८ आणि १९ डिसेंबर २०२१ रोजी पुणे जिल्हयातील उरुळी कांचन येथे होत असल्याची घोषणा परिषदेचे मुख्य विश्वस्त एस.एम.देशमुख यांनी काल उरुळी कांचन येथे झालेल्या एका बैठकीत केली. दर दोन वर्षांनी होणारे पत्रकारांचे हे अधिवेशन ऑगस्टमध्येच होणं अपेक्षित होतं मात्र कोरोनामुळं अधिवेशन लांबणीवर टाकावे लागले होते. देशभरातुन दोन हजार प्रतिनिधी अधिवेशनास उपस्थित राहतील असा अंदाज देशमुख यांनी व्यक्त केला त्यादृष्टीने तयारी केली जात आहे.

अखिल भारतीय मराठी पत्रकार परिषद ही देशातील मराठी पत्रकारांची सर्वात जुनी आणि एकमेव संघटना आहे. दिल्ली, गोवा,बेळगाव सह राज्यातील ३६ जिल्हे आणि ३५४ तालुक्यात मराठी पत्रकार परिषदेचा शाखा विस्तार झालेला असून जवळपास नऊ हजार पत्रकार परिषदेशी जोडलेले आहेत. दर दोन वर्षांनी होणारे हे अधिवेशन यापुर्वी रोहा, औरंगाबाद, शेगाव, पिंपरी-चिंचवड, नांदेड आदि ठिकाणी संपन्न झाले होते. उरुळी कांचन सारख्या ग्रामपंचायत क्षेत्रात प्रथमच हे अधिवेशन होत आहे. काल एस.एम.देशमुख, परिषदेचे कार्याध्यक्ष शरद पाबळे, विभागीय सचिव बापुसाहेब गोरे, जिल्हा अध्यक्ष सुनील लोणकर यांनी नियोजित अधिवेशनाच्या जागेची पाहणी केली.

दोन वर्षांपुर्वी नांदेड येथे झालेल्या पत्रकारांच्या अधिवेशनाचे उद्घाटन ज्येष्ठ पत्रकाराच्या हस्तेच व्हावे अशी भूमिका परिषदेने घेतली. त्यानुसार नांदेड अधिवेशनाचे उद्घाटन ज्येष्ठ पत्रकार पी. साईनाथ यांच्या हस्ते करण्यात आले होते. यावर्षी देखील एका ज्येष्ठ आणि मान्यवर पत्रकाराच्या हस्ते अधिवेशनाचे उद्घघाटन होणार असून प्रमुख पाहुणे म्हणून राज्यातील मान्यवर नेत्यांना निमंत्रित करण्यात येणार आहे. अधिवेशनात दोन दिवस भरगच्च कार्यक्रमाचे आयोजन करण्यात येत आहे. चर्चासत्र, परिसंवाद, आदि कार्यक्रमाबरोबरच आप की आदालत पध्दतीवर आधारित एका वरिष्ठ पत्रकाराच्या मुलाखतीचा कार्यक्रम देखील आयोजित केला जाणार आहे.डिजिटल माध्यमांचा प्रभाव बघता प्रिन्ट मिडियाला काही भवितव्य उरले आहे काय? या महत्वाच्या सर्व पत्रकारांच्या जिव्हाळ्याच्या विषयावर देखील अधिवेशनात विचारमंथन होईल.

पुणे जिल्हा मराठी पत्रकार संघ आणि हवेली तालुका मराठी पत्रकार संघ हे या अधिवेशनाचे आयोजक आहेत.अधिवेशनास येणाऱ्या पत्रकारांची संख्या लक्षात घेऊन आरोग्य विषयक सर्व व्यवस्था करण्यात येत आहे. दोन कोरोना प्रतिबंधक लसीचे डोस घेतलेल्या पत्रकारांनाच अधिवेशनात प्रवेश दिला जाईल, तसेच अधिवेशनात सोशल डिस्टंन्सिन, सॅनिटाईझर वापर, शारीरिक तापमान तपासणी बरोबरच आरोग्य पथक देखील तैनात करण्यात येणार असल्याची माहिती बैठकीत देण्यात आली.

बैठकीस स्थानिक संयोजन समितीचे पदाधिकारी सुनील जगताप, जनार्दन दांडगे, एम.जी.शेलार. बापुसाहेब काळभोर, गणेश सातव, तुळशीराम घुसाळकर, शहाजी नगरे, जयदिप जाधव, सुखदेव भोरडे, जितेंद्र आव्हाळे, विजय काळभोर, अमोल भोसले, सचिन माथेफोड, प्राचार्य बी.के. दिवेकर, उपप्रमुख बी.आर. भोसले आदि उपस्थित होते.

राज्यातील पत्रकारांच्या दृष्टीने अत्यंत महत्वाच्या असणाऱ्या अधिवेशनास पत्रकारांनी सर्व नियमांचे पालन करित मोठ्या संख्येनं उपस्थित राहावे असे आवाहन मुख्य विश्वस्त एस.एम.देशमुख, विश्वस्त किरण नाईक, अध्यक्ष गजानन नाईक, कार्याध्यक्ष शरद पाबळे, सरचिटणीस संजीव जोशी, कोषाध्यक्ष विजय जोशी, पुणे विभागीय सचिव बापुसाहेब गोरे, राज्य पसिध्दी प्रमुख अनिल महाजन, महिला संघटक जान्हवी पाटील, जिल्हा अध्यक्ष सुनील लोणकर, संयोजन समितीचे सुनील जगताप, जनार्दन दांडगे, बापुसाहेब काळभोर, गणेश सातव, तुळशिराम घुसाळकर, शहाजी नगरे, जयदिप जाधव, सुखदेव भोरडे, जितेंद्र आव्हाळे, अमोल भोसले, विजय काळभोर, आदिंनी केले आहे.

पृष्ठ क्र.१ वरुन...

## मोबाइल ॲक्सेसरीज खोपटे ऑलकार्गो लॉजिस्टिक येथून लंपास

कार्टून बॉक्स फक्त ५०८ बॉक्स व त्यांचे वजन ४ हजार १५० आयोजित १ हजार ४६० किलो इतकेच आढळले. सीमाशुल्क विभागाकडून पकडलेले संशयास्पद कंटेनर ज्या वेअर हाऊसमध्ये ठेवण्यात येतात. त्या ठिकाणी सुरक्षारक्षक तैनात असतात. मात्र त्यानंतरही चोरी होत असल्याने आश्चर्य व्यक्त करण्यात येत आहे.

## साई पॅलेस बारवर कारवाई

बारवर देखील कारवाई करून एकूण ७१ जणांवर गुन्हा दाखल करण्यात आला होता. असे असतानाही हे बार मालक बिनधास्तपणे शासकीय नियम पायदळी तुडवून आपले खिसे भरत आहेत व यामध्ये कोरोनामध्ये घ्यायच्या काळजी संदर्भात कुठलीही उपाय योजना करत नसल्याने व पूर्णपणे शासकीय नियमांचे उल्लंघन केले जात असल्याने व यातूनच कोरोनाचा पुन्हा एकदा पनवेल परिसरात प्रादुर्भाव वाढू शकतो या भितीपोटी परिसरातील ग्रामस्थांनी व महिलांनी हे बार कायमस्वरुपी बंद करावेत अशी मागणी करीत आहेत.

## केंद्रीय पर्यावरण मंत्री भूपेंद्र यादव आणि विरोधी पक्षनेते देवेंद्र फडणवीस शनिवारी पनवेलमध्ये

पंडित दीनदयाल उपाध्याय यांनी तेव्हा याचा सूवर्णमध्य साधत एकात्म मानववाद मांडला. धर्म, अर्थ, काम मोक्षाकडे नेण्यासाठी असतात हा विचारही एकात्मवादात मांडला आहे. 'एकात्म मानववाद' ही विचारधारा रुजवण्यावर भर दिला. मोदी सरकारच्या योजना सारकारण्यामागेही एकात्म मानवतावाद आहे. पंडित दीनदयाल उपाध्याय ग्रामीण कौशल्य योजना, स्टार्टअप इंडिया, मुद्रा बँक योजना, दीन दयाल उपाध्याय ग्राम ज्योती योजना, मुद्रा बँक योजना, मेक इन इंडिया आदी योजनांमध्येही एकात्मवादाचा विचार केला आहे. भारतीय जनता पक्षाच्या सबका साथ सबका विकास ही घोषणाही एकात्मवादाच्या विचारातून आली. ६० वर्षांपूर्वी मांडलेली एकात्म मानवतावादाची संकल्पना आजही तंतोतंत लागू पडते. अखंड समाजाचा विचार करणाऱ्या पंडित दीनदयाल उपाध्याय यांच्या चिंतनावर विचार करण्याची देशाला गरज आहे. सध्या देशात सुरू असलेल्या मेक इन इंडिया, स्टार्टअप इंडिया, ग्रामीण कौशल्य योजना, मुद्रा बँक योजना आदी कल्याणकारी योजनांमागे मोदी सरकारचा नेमका सिद्धांत अंत्योदय, असाच आहे. त्यांचा आदर्श घेऊन भाजपच्यावतीने आयोजित करण्यात आलेल्या सेवा व समर्पण अभियान' अंतर्गत दिव्यांगांना कृत्रिम अवयव, उपकरणे वाटप, आरोग्यतपासणी शिबीर, गरीबवस्ती, अनाथाश्रम, वृद्धाश्रम व रुग्णालयांना भेट देऊन फळेवाटप, प्लॅस्टिक निर्मूलन मोहीम, रक्तदान शिबीर, धान्य वाटप, कापडी पिशव्यांचे वाटप, नदी सफाई अभियान, अशाचप्रकारे विविध समाजोपयोगी उपक्रमराबविले जाणार आहेत, त्या अनुषंगाने पंडित दीनदयाळ उपाध्याय जयंतीनिमित्त आयोजित करण्यात आलेल्या या कार्यक्रमाला भाजपा व सर्व आघाड्यांचे पदाधिकारी, लोकप्रतिनिधी, शक्ती केंद्र, बूथ अध्यक्ष तसेच कार्यकर्त्यांनी बहुसंख्येने उपस्थित रहावे, असे आवाहन भाजपचे उत्तर रायगड जिल्हाध्यक्ष आमदार प्रशांत ठाकूर यांनी केले आहे.

## महेंद्र घरत यांच्या नेतृत्वाखाली उरण काँग्रेसमध्ये इनकमिंग जोशात

उपसरपंच समिर पाटील यांचे जिल्हा अध्यक्ष महेंद्र घरत यांनी सारडे गावात जाऊन त्यांचे अभिनंदन केले व पुढील वाटचालीस शुभेच्छा दिल्या. अहोरात्र मेहनत घेतलेल्या या कार्यकर्त्याला आज खऱ्या अर्थाने न्याय मिळाला आहे. त्यांचा योग्य असा सन्मान आज झाला आहे. या प्रसंगी सारडे गावातील सखाराम पाटील, अजित पाटील, प्रमोद पाटील यांनी आपल्या कार्यकर्त्यांसह जिल्हा अध्यक्ष महेंद्र घरत यांच्या कार्यप्रणालीवर विश्वास ठेऊन. त्यांच्या उपस्थितीत काँग्रेस पक्षात प्रवेश केला.यावेळी महेंद्र घरत ल यांनी त्यांचे शाल पुष्पगुच्छ देऊन काँग्रेस पक्षात स्वागत केले.

यावेळी सारडे काँग्रेस कमिटीच्या अध्यक्षपदी चंद्रकांत पाटील व उपाध्यक्षपदी संकेत पाटील यांची निवड झाल्याने त्यांचेही घरत यांनी अभिनंदन केले. या प्रसंगी कोप्रोली येथील संजीवनी हॉस्पिटलचे डॉक्टर सिद्धराम आरवती -पाटील यांच्या निःस्वार्थ वैद्यकीय जनसेवे बद्दल त्यांचा महेंद्र घरत यांच्या हस्ते सत्कार करण्यात आला.यावेळी रायगड जिल्हा काँग्रेसचे उपाध्यक्ष मिलिंद पाडगावकर , माजी जिल्हा परिषद सद्स्य विनोद म्हात्रे, जेष्ठ काँग्रेस नेते. ए.डी. पाटील ग यशवंत घरत,उरण तालुका काँग्रेस महिला अध्यक्षा सौ. रेखाताई घरत, इंटक रायगड जिल्हा अध्यक्ष किरिट पाटील, रमाकांत गावंड,उमेश भोईर,समाधान म्हात्रे, विजय म्हात्रे,लंकेश ठाकूर, उमेश ठाकूर,राजेंद्र भगत,योगेश म्हात्रे,महेश म्हात्रे चंद्रशेखर ठाकूर यांच्यासह काँग्रेस कार्यकर्ते मोठ्या संख्येने उपस्थित होते.

# विक्रांत पाटील यांच्या वतीने प्रभाग १८ मधील अशोक बाग व लोखंडी पाडा येथे कचरा या विषयावर जनजागृती मोहीम

**दै.रायगड नगरी । पनवेल**

माझा प्रभाग, स्वछ प्रभाग अंतर्गत प्रभाग १८ ला कचरा मुक्त करण्यासाठी नगरसेवक विक्रांत पाटील आणि महापालिका आरोग्य विभाग यांच्या संयुक्त विद्यमाने अशोक बाग आणि लोखंडी पाडा येथे रस्त्यावर कचरा न टाकण्याबद्दल नागरिकांच्या मध्ये जनजागृती करण्याची मोहीम घेण्यात आली. नागरिकांच्या घरोघरी जाऊन त्यांना ओला,सुखा आणि जैविक कचरा वेगळा करून घंटा गाडीत टाकावा असे सांगण्यात आले.

कचऱ्यामुळे रोगराई पसरते व डासांचा पण प्रादुर्भाव वाढतो हे येथील नागरिकांना समजावून सांगण्यात आले. येथील नागरिकांच्या सेवेसाठी घंटागाडी सकाळ-संध्याकाळ अशी दिवसातून दोन वेळा फेरी मारणारा आहे. आपला प्रभाग स्वच्छ प्रभाग रहावा यासाठी नागरिकांनी सहकार्य करावे आणि रस्तावर कचरा टाकू नये अशी विनंती या मोहीमे अंतर्गत करण्यात आली. याच निमित्ताने अशोक बाग आणि लोखंडी पाडा येथे डासांचा प्रादुर्भाव होऊ नये म्हणून जंतुनाशक फवारणी सुद्धा करून घेण्यात आली. माझा प्रभाग, स्वच्छ प्रभाग या मोहिमेला यशस्वीपणे राबवायला नागरिक नक्कीच सहकार्य करतील असे मत नगरसेवक विक्रांत पाटील यांनी व्यक्त केले.



हे दैनिक मालक, मुद्रक, प्रकाशक, मुख्य संपादकः **सुनील कृष्णाजी पोतदार** यांनी सिद्धकला प्रिंट मिडीया ॲण्ड पब्लिकेशन्स प्रा.लि., प्लॉट नं.डब्ल्यू-२३०, टी.टी.सी.इंडस्ट्रीयल एरिया, एमआयडीसी, ठाणे बेलापूर रोड, कोपरखैरणे, नवी मुंबई-४००७१० येथे छापून १२, राधा हरी निवास कॉम्प्लेक्स, टिळक रोड, रामदास मंदिरासमोर पनवेल-४१०२०६, रायगड येथून प्रकाशित केले.
दूरध्वनी (०२२) २७४६९४३४, फॅक्स-२७४६७६१७ **संपादक : राकेश दिलीप पितळे** R.N.I.Reg.No.MAHMAR/2006/17212 या अंकात प्रसिद्ध झालेल्या बातम्या व लेख यामधून व्यक्त झालेल्या मतांशी संपादक सहमत असतीलच असे नाही. (न्यायकक्षा-पनवेल) Email : raigad.nagari@gmail.com/ raigad.nagari@yahoo.com/ raigad.nagari@rediffmail.com

# संक्षिप्त...

## गणेशोत्सवात आदिवासी मुलांना नवीन कपडे व खाऊचे वाटप

**दै.रायगड नगरी । पाली/बेणसे**

सुधागड तालुक्यातील वाकणवाडी ग्रामस्थ विविध सण, उत्सव व जयंती विधायक उपक्रमांनी साजरे करत आहेत. यंदा गणेशोत्सवा निमित्त नुकतेच गावातील सर्व आदिवासी लहान मुलांना नवीन कपडे व खाऊ देऊन उत्सव साजरा केला. अशा प्रकारे विविध सण आणि महापुरुषांच्या जयंती विधायक उपक्रमाद्वारे राबवून वाकणवाडी गावाने एक नवा आदर्श घालून दिला आहे.

सत्यशोधक वारकरी महासंघ कोकण विभाग अध्यक्ष व ग्रामस्त महेश पोंगडे महाराज यांनी सकाळला सांगितले की दुःखी, कष्टी, गरीब ,गरजू लोक व मुक्र्या जनावरांमध्ये देव पहा असे संतांनी सांगितले आहे. हा विचार आमच्या गावाच्या सर्व तरुण व ग्रामस्थांना समजला. आणि विविध सणांचे औचित्य साधून कधी वृक्षारोपण तर कधी नदीचा गाळ काढून जल साठवण उपक्रम राबविले जातात. महापुरुषांच्या जयंतीला पुस्तक वाटप आणि महाशिवरात्रीला दूध वाटप व जेष्ठांचा सत्कार, तर नवरात्रीला गरजू महिलांना साडी वाटप. असे विविध विधायक उपक्रम गावात राबविले जातात. या प्रामाणिक कार्याला अनेक दानशूर व्यक्ती वेळोवेळी मदतही करतात. या कपडे व खाऊ उपक्रमास तहसीलदार दिलीप रायण्णावार यांनी आर्थिक मदत केली. कार्यक्रमास ह भ प पोंगडे महाराज, तुकाराम ठोंबरे, महादू दळवी, गजानन दळवी, ज्ञानेश्वर फोंडे, ज्ञानेश्वर हुले, निलेश हुले, सोनू पोंगडे, तुकाराम चव्हाण, रघुनाथ दळवी, तान–ाजी दळवी, विनायक पोंगडे, सटूराम पोंगडे, अमोल पोंगडे दीपक पोंगडे, सुभाष फोंडे, महादू बेलोसे, लक्ष्मण पोंगडे आदी ग्रामस्थ, शिक्षक वैभव नाणेकर, कैलास सांगळे, आदिवासी तरुण व विद्यार्थी उपस्थित होते.

## ह.भ.प. गणेश पाठे यांचे निधन

**दै.रायगड नगरी । पनवेल**

मोहो येथील ह.भ.प. गणेश कान्हा पाठे यांचे अल्पशा आजाराने निधन झाले आहे. त्यांच्यावर मोहो येथील स्मशानभूमीत अंत्यसंस्कार करण्यात आले.त्यांची दशक्रिया विधी २९ सप्टेंबर रोजी श्रीक्षेत्र देवाची आळंदी येथे तर उत्तरकार्य ३ ऑक्टोबर रोजी राहत्या घरी मोहो येथे होणार आहे. त्यांच्या पश्चात मुले, सुना, नातू असा परिवार आहे.

## पनवेल जवळून इसम बेपत्ता

**दै.रायगड नगरी । पनवेल**

राहत्या घरात कोणास काही एक न सांगता कुठेतरी एक इसम निघून गेल्याने तो हरविल्याची तक्रार पनवेल शहर पोलीस ठाण्यात करण्यात आली आहे. दत्ता रामा पाटील (५० रा.कुंडेवहाळ) असे या इसमाचे नाव असून केस काळे, मिशी जाड, रंग सावळा, उंची ५ फूट ५ इंच असून अंगामध्ये सफेद रंगाचे शर्ट व काळ्या रंगाची पॅन्ट तसेच डोक्यावर जुन्या माराची खुण व पायात चप्पल आहे.

# द्रोणागिरी धरण तलावातील फ्लॅप गेट कायमस्वरूपी ठेवण्याची ग्रामस्थांची सिडकोकडे मागणी

**दै.रायगड नगरी । उरण**

उरण तालुक्यातील द्रोणागिरी धारण तलाव क्र. २ समोरील मौजे चाणजे येथील शेत जमीन समुद्राच्या पाण्यापासून सुरक्षित राहण्यासाठी पाईप आउटलेट वर सिडकोकडून बसविलेले फ्लॅप गेट कायमस्वरूपी ठेवण्यात यावे अशी स्थानिक ग्रामस्थ, शेतकऱ्यांची मागणी आहे. त्यानुसार ग्रामस्थांचे, शेतकऱ्यांचे हित लक्षात घेऊन सदर फ्लॅप गेट कायमस्वरूपी ठेवण्यात यावेत यासाठी चाणजे शेतकरी संघर्ष समितीतर्फे रायगड जिल्हाधिकारी, अप्पर प्रधान मुख्य वनसंरक्षक कांदळवन कक्ष मुंबई, कोकण आयुक्त नवीमुंबई, व्यवस्थापकीय संचालक सिडको नवी मुंबई, आमदार उरण यांना पत्रव्यवहार करून निवेदन देण्यात आले आहे.



द्रोणागिरी धारण तलाव क्रमांक २ समोरील मौजे चाणजे, तालुका उरण येथील शेत जमीन ही शेतकर्यांच्या स्वतःच्या मालकीचे असून मौजे चाणजे सर्वे नंबर ४१८, ४२१, ४२२, ४२३ ह्या जमीनी संपादित न करता या जमिनीवर सिडकोकडून पाईप आउटलेट बांधण्यात आले आहे. परंतु पाईप आउटलेटची प्लॅप गेट काढल्यामुळे समुद्राचे पाणी मोठ्या प्रमाणात शेतजमीनीत शिरत आहे. आणि शेतकऱ्यांच्या जमिनीचे अस्तित्व संपुष्टात येत आहे. पिकत्या जमिनी नापीक बनत आहे. शिवाय यासंदर्भात शेतकऱ्यांना शासनाकडून कोणतेही नुकसान भरपाई मिळत नाही.

या समस्येसंदर्भात सर्व शेतकऱ्यांनी एकत्र येत ९ मार्च २०२१ रोजी चाणजे शेतकरी संघर्ष समितीच्या माध्यमातून संबंधित जमिनीचे होणारे नुकसान, त्याचे फोटो, शेतकऱ्यांचे नाव व सहि,सातबारा उतारा आदी सर्व पुरावे शासकीय दप्तरी सादर केले होते. सादर केलेल्या पुराव्याच्या आधारे सिडकोकडून २०२१मधील मे महिन्यामध्ये संबंधित पाईप आउटलेटची ८० टक्के प्लॅप गेट लावण्यात आली. परिणामी शेतकऱ्याच्या जमिनीत समुद्राचे पाणी कमी प्रमाणात शिरत आहेत.

शेतजमीन सुरक्षितेसाठी व होणाऱ्या प्रचंड नुकसानापासून वाचण्यासाठी सिडकोकडून लावण्यात आलेले ८० टक्के प्लॅप गेट १०० टक्के लावण्याचे आदेश देऊन ती कायमस्वरूपी १२ महिने ठेवण्यात यावी, अशी मागणी सर्व शासकीय विभागात पत्रव्यवहाराद्वारे करण्यात आल्याची माहिती चाणजे शेतकरी संघर्ष समितीचे अध्यक्ष अविनाश म्हात्रे यांनी दिली. खाडी वाचावी, कांदळवन वाढावे यासाठी ज्या एनजीओ आणि संस्था फ्लॅप गेट काढण्यासाठी विभागीय कोकण आयुक्त कार्यालयात विनवण्या करीत आहेत. त्यांना अविनाश म्हात्रे यांनी आमच्या ७/१२ धारक शेतकऱ्यांच्या स्वतःच्या मालकीच्या शेत जमिनीत समुद्राचे पाणी शिरून कांदळवन तयार झाले तर आमच्या शेतकऱ्यांना एनजीओ किंवा संस्था नुकसान भरपाई देणार आहेत का ?असा खोचक सवाल केला आहे.

> चाणजे खाडी येथे जवळजवळ २५० एकर शेतकऱ्यांची जमीन समुद्राच्या पाण्यापासून वाचविण्यासाठी सर्व शेतकरी एक झाले आहेत. सप्टेंबर महिन्यानंतर पाईप आउटलेट वरील लावलेले फ्लॅट गेट काढण्यात येणार आहेत.समुद्राचे पाणी अडवण्यासाठी लावलेले ८० टक्के फ्लॅप गेट जून महिन्यात लावण्यात आले आहेत.परंतु सिडको प्रशासनाला फक्त पावसाळा हंगाम पुरतेच फ्लॅप गेट लावण्याचे आदेश कोकण विभाग आयुक्त यांनी दिल्यामुळे ते सप्टेंबर महिन्यानंतर पुन्हा काढण्यात येणार आहेत.२०२१च्या जून महिन्यात लावण्यात आलेले ८० टक्के फ्लॅप सप्टेंबर महिन्यानंतर देखील न काढता ते अखंड बाराही महिने ठेवण्यात यावे तसेच १०० टक्के फ्लॅप गेट लावण्यात यावेत जेणेकरून शेतकऱ्यांची सुपीक शेततजमीन व्यवसाय सुरक्षित राहतील यासंदर्भात प्रशासनाच्या विविध विभागात पत्रव्यवहार करण्यात आले आहेत.
>
> **अविनाश म्हात्रे, अध्यक्ष चाणजे शेतकरी संघर्ष समिती**

# कोंडगाव ग्रामपंचायत हद्दीतील आदीवासी बांधवांना लसीकरण

**दै.रायगड नगरी । वाकण**

जिल्ह्यातील आदिवासी बांधवांमध्ये कोरोना प्रतिबंधक लस घेण्यास काहीशी उदासीनता दिसून येत आहे. असे असतांनाच नागोठण्याजवळील कोंडगाव (ता.रोहा) ग्रामपंचायत हद्दितील आदिवासी वाड्यांमधील आदिवासी बांधवांना लसीकरण करण्याची महत्वाची कामगिरी कोंडगाव ग्रामपंचायतीने नागोठणे प्राथमिक आरोग्य केंद्राच्या सहकार्याने केली आहे.



कोंडगाव ग्रामपंचायतीच्या वतीने कोंडगाव येथील राजिप प्राथमिक शाळेच्या इमारतीत गुरुवार दि. २३ सप्टेंबर रोजी नागोठणे प्राथमिक आरोग्य केंद्रामार्फत कोंडगाव ग्रामपंचायत हद्दीतील आदिवासी बांधवांसाठी कोरोना प्रतिबंधक लसीकरण मोहिम राबविण्यात आली. यामध्ये १२५ आदिवासी बांधवाचे कोरोना प्रतिबंधक लसीकरण करण्यात आले. यावेळी कोंडगाव ग्रामपंचायतीच्या सरपंच कमल बुरूमकर, उपसरपंच अनंत वाघ, माजी सरपंच तथा विद्यमान सदस्य निखिल मढवी, ग्रामसेविका विद्या घरत, नागोठणे आरोग्य केंद्रातील वैद्यकीय अधिकारी डॉ. श्रुती मोरे, आरोग्य सेवक वंदन तांबोली, जगदीश मोरे, निलीमा जाधव, जगदीश मोरे, रुग्णवाहिका चालक आल्हाद पिंगळे, आशासेविका चित्रा मढवी, प्रीती बुरूमकर आदींसह ग्रामस्थ यावेळी उपस्थित होते.

नागोठणे प्राथमिक आरोग्य केंद्राने व केंद्रांतर्गत असलेल्या सर्व सात उपकेंद्रांनी नागोठणे विभाग तसेच आजूबाजूच्या परिसरात कोविड प्रतिबंधक लसीकरणात लक्षणीय कामगिरी केली आहे. त्यामुळे विभागातील नागरिकांमध्ये समाधानी वाता–वरण निर्माण झाले असून प्राथमिक आरोग्य केंद्रातील अधिकारी व कर्मचारी यांना नागरिक धन्यवाद देण्यात येत आहेत .

# शिवसेनेच्या प्रयत्नामुळे मिळणार कळंबोलीवासियांना पिण्याचे स्वच्छ पाणी

**दै.रायगड नगरी । पनवेल**

शिवसेनेच्या प्रयत्नामुळे कळंबोली वासियांना आता स्वच्छ पाणी पिण्यास मिळणार असल्याने कळंबोलीवासियांनी समाधान व्यक्त केले आहे.

रायगड जिल्हा प्रमुख शिरीष घरत यांच्या आदेशाने, महानगर प्रमुख रामदास शेवाळे, विधानसभा समन्वयक प्रदीप ठाकूर यांच्या मार्गदर्शनाने शिवसेना कळंबोली शहर शाखेतर्फे सिडको पाणी विभाग कळंबोली यांच्याकडे पिण्याच्या पाण्यातून सांडपाणी मिश्रित पाणी येत असून त्यामुळे मोठ्या साथीचे रोग व आजार पसरत असल्याची तक्रार शहर प्रमुख डी एन मिश्रा, शहर समन्वयक गिरीश धुमाळ, शहर संघटक अक्षय साळुंखे, पाठपुरावा केलेले उपशहर प्रमुख सूर्यकांत म्हसकर, उपशहर प्रमुख नारायण फडतरे, उपविभाग प्रमुख तुषार निढाळकर, विभाग प्रमुख महेश गुरव, स्थानिक रहिवाशी आणि पदाधिकाऱ्यांनी सहाय्यक कार्यकारी अभियंता प्रशांत चहिरे यांच्याकडे केली होती. त्यानुसार या तक्रारीची दखल घेत आज प्रत्यक्ष नवीन पाईप लाईन टाकण्याच्या व दुरुस्तीच्या कामाला सुरूवात करण्यात आली. त्यामुळे लवकरच कळंबोली वासियांना स्वच्छ पाणी पिण्यासाठी मिळणार असल्याने रहिवाशांनी समाधान व्यक्त केले आहे.



# भिवंडी -श्रीवर्धन बस देवघर सह अन्य थांब्यावर थांबतच नसल्याची तक्रार



**दै.रायगड नगरी । उदय कळस**

**म्हसळा** : म्हसळा काही प्रमाणात शहरी भागात तसेच संपुर्ण महाराष्ट्रात ग्रामिण भागात प्रवासासाठी एसटी बस शिवाय पर्याय नाही. गाव तेथे रस्ता अन रस्ता तेथे एसटी हे ब्रीद वाक्य प्रवाशांच्या अंगवळणी पडल असतानाच अधिकृत थांब्यावर हात दाखवूनही एसटी बस न थांबल्यामुळे शेवटच्या थांब्या पर्यंत जाणाऱ्या प्रवाशांचे काय हाल होत असतील त्याचा अनुभव माणगाव– श्रीवर्धन मार्गावरील देवघर थांब्यावरील जनतेला भिवंडी –श्रीवर्धन– भिवंडी गाडीचे ड्रायव्हर– कंडक्टरने हात दाखवून पॅसेंजरला अवलक्षण दाखवि ल्यावर झाला.

या घटनेचे भान राखत तालुक्यातील एस.टी.प्रवासी दूत अनिल महामुनकर व सुरेंद्र शिर्के यानी थेट विभागनियंत्रक ठाणे यांचे कडे झाल्या प्रकाराची कैफीयत सादर केली आहे व महाराष्ट्र राज्य मार्ग परिवहन चे या विषयाचे सन २०१३चे प्रादेशिक व्यवस्थापकांचे पत्र सादर केले आहे. त्यामुळे श्रीवर्धन परिसरातुन मुंबईकडे व अन्य मार्गावर जाणाऱ्या येणाऱ्या बसेसना (कोणत्याही आगाराच्या) श्रीवर्धन ते माणगाव व श्रीवर्धन ते गोरेगाव या मार्गावरील सर्व थांब्यांवर प्रवासी चढ–उतार करणे वाहक –चाल काना बंधनकारक आहे. श्रीवर्धन आगारा व्यतिरिक्त ठाणे, स्वारगेट व भिवंडी आगाराच्या ठाणे –बागमांडला – ठाणे, ठाणे – दिवेआगर – ठाणे, स्वारगेट–दिवेआगर – स्वारगेट ( व्हाया गोरेगांव), भिवंडी– श्रीवर्धन –भिवंडी या चार मार्गावर बस फेऱ्या सुरु आहेत.


**CHANGE OF NAME**

My old Name was **Gozail Ahmed Fayyaz Shaikh** As per Gazzete No.(M-2134835), I will be known as **Gozail Ahmed Faiyaz Shaikh (New Name)** R/A : 65/1, Waji Mohalla, Masjid Chawl, Old Panvel, Raigarh

**Gozail Ahmed Faiyaz Shaikh**

**(Sd/- New Name)**


# मालसई येथील प्रधानमंत्री सूक्ष्म अन्न प्रक्रिया उद्योग योजना कार्यशाळेस महिलांचा प्रतिसाद

**दै.रायगड नगरी । धाटाव**

रोहा कृषिविभागाच्या वतीने बुधवार दिनांक २२ सप्टेंबर रोजी मालसई येथील श्री विठ्ठल रखुमाई मंदिरामध्ये प्रधानमंत्री सूक्ष्म अन्नप्रक्रिया उद्योग योजनेची कार्यशाळा आयोजित करण्यात आली होती. महिला सक्षमीकरणासाठी या योजना कशा लाभदायक आहे याचे मार्गदर्शन यावेळी उपस्थित मान्यवरांनी महिलांना केले.

महिलांनी स्वतःच्या कर्तृत्वाने आपला छोटा उद्योग उभा करावा व आर्थिकदृष्ट्या सक्षम व्हावे. तसेच महिला बचत गट व महिला समुहाने एकत्रित संघटित होऊन काम करणे गरजेचे आहे.शासन आपणास हातभार लावण्यासाठी विविध योजना कार्यान्वित करीत आहे, आपण त्यांचा लाभ घेतला पाहिजे असे प्रतिपादन कृषी पर्यवेक्षक दिगंबर साळे यांनी केले.

सुतार यांनी या योजनांची चांगल्या प्रकारे माहिती उपस्थित महिलांना दिली. यावेळी पत्रकार रविना मालुसरे यांनी मालसई मधील महिला बचत गटांना शासकीय योजनांचा लाभ मिळावा यासाठी प्रशासनाने सहकार्य करण्याचे आवाहन केले.कार्यक्रमाच्या यशस्वीतेसाठी कृषी पर्यवेक्षक दिगंबर साळे, सुतार व पल्लवी उबाळे यांनी मेहनत घेतली. कार्यक्रमासाठी ग्रामपंचायतीच्या सरपंच रसिका मालुसरे तसेच मालसई मधील महिला बचत गटांच्या पदाधिकारी, महिला मंडळाच्या पदाधिकारी व गावातील जेष्ठ नागरिक उपस्थित होते.


## INVITATION OF BID

Dated : 24 th September 2021

Sub : Invitation of sealed quotations for procurement of CCTV camera and NVR

| Bid System | Single Bid |
|---|---|
| Last date of Bid submission | 2 nd October 2021 |
| Bid Should be address to | Building No.17 G, Flat No.104, Indiabulls Green Marigold CHSL, Sector-4, Kon, Panvel, Dist-Raigad |
| EMD | EMD of Rs.10,000/- through demand draft from any bank in favour of Indiabulls Greens Marigold CHSL |

The Complete Tender document will be purchased from society office.

**The bids should be address to :**
**Indiabulls Greens Marigold CHSL**
**Building No.17 G, Flat No.104,**
**Sector-4, Kon, panvel, Dist Raigad**

For any clarification, write to email :
**ibmarigoldchsl@gmail.com.**
**Phone No : 8097792905**

**Sd/-**
**Secretary**
**Indiabulls Greens Marigold CHSL**



## जाहीर नोटीस

तमाम सर्व लोकांस व विशेषतः भोकरपाडा (चिपळे) पनवेल महानगरपालिका / सिडको हद्दीतील मौजे : तळोजा II, तालुका : पनवेल, जिल्हा : रायगड परिसरातील लोकांना या जाहीर नोटीसीद्वारा कळविण्यात येते की,

**मौजे : भोकरपाडा (चिपळे), ता.पनवेल, जि.रायगड**

| सर्व्हे नं. | हिस्सा नं. | क्षेत्र हे.आर.पॉ. | आकार रु.पै. |
|---|---|---|---|
| ३२ | ३ | ०–१२–००<br>पो.ख. ०–००–० | २.५० |

**वर नमूद मिळकती पैकी ८ (आठ) गुंठे जमीन**

वर नमूद परिशिष्टात वर्णन केलेली मिळकत आमचे अशिलांनी विद्यमान मालक श्री.काळुराम उर्फ राम परशुराम म्हात्रे, श्री.शांताराम शंकर म्हात्रे दोघे रा.भोकरपाडा (चिपळे), ता.पनवेल, जि.रायगड ह्यांच्याकडून कायम खरेदी खताने विकत घेत आहेत. तरी या जाहीर नोटीशीद्वारे कळविण्यात येते की, उपरोक्त मिळकतीचे संदर्भात कोणाचाही, कसल्याही प्रकारचा गहाण, दान, बक्षिस, लीन, लीज, विसारपावती, कुलमुखत्यारपत्र, खरेदीखत, कुळ, खंड, अदलाबदलपत्र, साठेकरार, असाईनमेंट, पोटगी अथवा अन्य कोणत्याही प्रकारचा हितसंबंध, वाद, दावा असल्यास त्यांनी ही नोटीस प्रसिद्ध झालेपासून २१ एकवीस दिवसांच्या आत आपले लेखी पुरावे, म्हणणे अथवा कागदपत्रे आमच्या खालील पत्यावर आणून समक्ष दाखवून आमची खात्री पटवून द्यावी. मुदतीत हरकत अथवा तक्रार न आल्यास त्यांनी तो हक्क जाणीवपूर्वक सोडून दिलेला आहे असे समजून आमचे अशिल सदर मिळकतीचा व्यवहार पूर्ण करतील. मागाहून कोणाचीही तक्रार व सबब चालणार नाही. कोणाचेही नुकसान होवू नये म्हणून ही जाहीर नोटीस प्रसिद्ध केली आहे. **परिशिष्ट मिळकतीचे वर्णन** : तुकडी रायगड, मौजे : भोकरपाडा (चिपळे), ता.पनवेल, जि.रायगड. मे.दुय्यम निबंधक साहेब पनवेल यांचे हद्दीतील सर्व्हे नं.३२, हिस्सा नं.३, क्षेत्रफळ ०–१२–०, आकार २.५० रु, ता.पनवेल, जि.रायगड यापैकी ८ गुंठे जमीन यांसी यापैकी विद्यमान मालकांचे खरेदी विक्री संदर्भात जमीन मिळकत या जाहीर नोटीसीचा विषय असे. सदर मिळकतीच्या कायम खरेदी खताच्या संदर्भ हा ह्या जाहीर नोटीसीचा विषय असे.

दि.२३/०९/२०२१

**सही/–**
**श्री लिगल सर्व्हिसेस**
**ॲड.सुधीर एस. म्हात्रे**
**ॲड.कल्याणी एस. म्हात्रे**
**ऑफिस नं.६, त्रिमुर्ती इनक्लेअर को. ऑ.हौ.सोसा., प्लॉट नं.०६, सेक्टर ०९, सक्षम मॉलच्या मागे, कॅनरा बँक जवळ, कामोठे, ता.पनवेल, जि.रायगड**
**मो.नं.९६६४०९८३४७/९०८२३३८३१५**


## बम्बईपाडा परिसरात आढळला मृतदेह

**दै.रायगड नगरी । पनवेल**

तालुक्यातील बम्बईपाडा परिसरात एका इसमाचा मृतदेह आढळून आला असून त्याच्या नातेवाईकांचा शोध पनवेल शहर पोलीस करीत आहेत. सदर इसमाचा रंग गोरा, अंगाने मध्यम, डोक्याचे केस काळे पांढरे असून, अंगात चॉकलेटी रंगाची फुल पॅन्ट घातलेली आहे.


अर्जदाराचे वकील
ॲड.रोहिदास हरी आगलावे

## जाहीर नोटीस

पनवेल येथील मे.दिवाणी न्यायाधिश वरिष्ठ स्तर यांचे कोर्टात

दि.चौ.अर्ज क्र.१३०४/२०२१
नि.नं.८/ड
ने.ता.११/११/२०२१

१) श्रीमती.कल्पना श्याम दहातोंडे
वय : ५१ वर्षे, धंदा : घरकाम
राहणार : ३०४, श्री गणेश लिला,
प्लॉट नं.१६९–१७०, सेक्टर १०, नवीन पनवेल,
ता.पनवेल, जि.रायगड, महाराष्ट्र–४१०२०६
२) सौ.शालिनी संदीप निकाळे
वय : ३३ वर्षे, धंदा : घरकाम
राहणार : ०५, लोयना सदन, आय एस पी स्कूल
जवळ, गोरे वाडी, नाशिक रोड, नाशिक महाराष्ट्र–४२२१०१
३) सौ.करुणा आकाश फडके
वय : २९ वर्षे, धंदा : घरकाम
राहणार : ढोंगऱ्याचा पाडा शाळेजवळ,
मु.ढोंगऱ्याचा पाडा, पोस्ट देवीचापाडा,
ता.पनवेल, जि.रायगड, महाराष्ट्र–४१०२०८ अर्जदार

तमाम जनतेस या जाहीर नोटीसीद्वारे असे कळविण्यात येते की, कै. श्याम पावलस उर्फ पौलस दहातोंडे यांचे निधन दि.२०/१०/२०१७ रोजी किंग एडवार्ड मेमोरियल हॉस्पिटल ॲण्ड मेडीकल कॉलेज मुंबई येथे झाले असून, १) श्रीमती.कल्पना श्याम दहातोंडे, राहणार : ३०४, श्री गणेश लिला, प्लॉट नं.१६९–१७०, सेक्टर १०, नवीन पनवेल, ता.पनवेल, जि.रायगड, महाराष्ट्र–४१०२०६, २) सौ.शालिनी संदीप निकाळे, राहणार : ०५, लोयना सदन, आय एस पी स्कूल जवळ, गोरे वाडी, नाशिक रोड, नाशिक, महाराष्ट्र –४२२१०१, ३) सौ.करुणा आकाश फडके, राहणार : ढोंगऱ्याचा पााडा शाळेजवळ, मु.ढोंगऱ्याचा पाडा, पोस्ट देवीचापाडा, ता.पनवेल, जि.रायगड, महाराष्ट्र–४१०२०८ यांनी कै.श्याम पावलस उर्फ पौलस दहातोंडे यांच्या मालकीच्या खालील वर्णनाच्या मिळकतीचे वारस दाखला मिळण्यासाठी अर्ज केलेला आहे.

**मिळकतीचे वर्णन**

**पनवेल महानगरपालिकेच्या हद्दीतील प्लॉट नं.१६९–१७०, सेक्टर १०, नवीन पनवेल, ता.पनवेल, जि.रायगड, महाराष्ट्र–४१०२०६ वरील श्री गणेश लिला बिल्डींग मधील तिसऱ्या मजल्यावरील फ्लॅट नं.३०४, बिल्टअप क्षेत्र ४७०.०० चौ.मी. अशा वर्णनाचा फ्लॅट**

कै.श्याम पावलस उर्फ पौलस दहातोंडे यांचे मृत्यूपश्चात अर्जदार हेच कायदेशीर वारस आहेत. सदर वारसांव्यतिरिक्त इतर कोणीही वारसदार नाहीत. सबब अर्जदार सदरचा वारसदाखला मिळण्यासाठी अर्ज करीत आहेत. सदर वारसांव्यतिरिक्त इतर कोणाच्याही हरकती असल्यास त्यांनी नोटीस प्रसिद्ध झाल्यापासून ३० दिवसांचे आत या न्यायालयात सादर कराव्यात. मुदतीत हरकती न आल्यास कोणत्याही हरकती नाहीत असे समजून अर्जदार यांस वारस दाखला देण्यात येईल व मागाहून येणाऱ्या कोणत्याही हरकतींचा विचार केला जाणार नाही.

आज दि.२३/०९/२०२१ रोजी माझ्या सहीनिशी व न्यायालयाच्या शिक्क्यानिशी दिली.

**सही/–** **क.लिपीक** **दि.न्या.व.स्तर, पनवेल**

कोर्टाचा शिक्का

**सही/–** **सहा.अधिक्षक** **दि.न्या.व.स्तर, पनवेल**

